# केंट क्लब, कोल्हापूर निर्मित विविध पारितोषिके

## सुधारित नियमावली

१. **शहीद हेमंत करकरे विशेष शैक्षणिक गुणवत्ता पारितोषिक व स्मृतिचिन्ह**
सदरचे पारितोषिक व ट्रॉफी ही पदवीस्तरावरील सर्व विद्याशाखामधून प्रथम येणा—या विद्यार्थी/विद्यार्थीनीस देण्यात यावे. जर गुणानुक्रमे जास्तीत जास्त गुण प्राप्त करणा—यांची संख्या एकापेक्षा अधिक असल्यास पारितोषिक विभागून देण्याऐवजी ज्या विद्यार्थी / विद्यार्थीनीस १२ वी परीक्षेत जास्तीत जास्त गुण मिळाले त्यास किंवा तीस ते प्रदान करावे. सदरचे नामांकन परीक्षा विभागाकडून घेऊन याबाबतची कार्यवाही ही दरवर्षी पदव्युत्तर प्रवेश विभागामार्फत जाहीर करण्यात येईल.

२. **शहीद अशोक कामटे विशेष क्रीडा प्राविण्य पारितोषिक व स्मृतिचिन्ह**
वैयक्तिक क्रीडा प्रकारात आंतरराष्ट्रीय/राष्ट्रीय/राज्यस्तरीय किंवा विद्यापीठ स्तरावर प्राविण्य मिळविणा—या विद्यार्थ्यास किंवा विद्यार्थिनीस सदरचे पारितोषिक देण्यात येईल. याबाबतची कार्यवाही ही दरवर्षी क्रीडा विभागाकडून करण्यात येईल.

३. **शहीद मेजर संदीप उन्नीकृष्णन विशेष एन.सी.सी. प्राविण्य पारितोषिक व स्मृतिचिन्ह**
दरवर्षी सदरचे पारितोषिक हे शिवाजी विद्यापीठाच्या संलग्न महाविद्यालयात/मान्यता प्राप्त संस्थेत एन.सी.सी. मध्ये असणा—या छात्रसैनिक/छात्रसैनिका यांच्यामधून गुणवत्तेनुसार सर्वप्रथम येणा—यास देण्यात येईल. यासाठी एन.सी. सी. भवन, कोल्हापूर यांच्या कार्यालयाकडून प्राप्त होणारे नामांकन ग्राहय धरण्यात येईल. याबाबतची कार्यवाही ही दरवर्षी पदव्युत्तर प्रवेश विभागामार्फत जाहीर करण्यात येईल.

४. **शहीद विजय साळसकर विशेष एन.एस.एस. प्राविण्य पारितोषिक व स्मृतिचिन्ह**
दरवर्षी शिवाजी विद्यापीठाच्या एन.एस.एस. प्रथम पुरस्कार प्राप्त सर्वोत्कृष्ट ठरणा—या (विद्यार्थी किंवा विद्यार्थिनी) स्वयंसेवकास सदरचे पारितोषिक देण्यात येईल. सदर पारितोषिक जाहीर करण्याची याबाबतची कार्यवाही ही दरवर्षी एन.एस.एस. विभागाकडून केली जाईल.

५. **शहीद तुकाराम ओंबाळे विशेष कला, साहित्य व सांस्कृतिक प्राविण्य पारितोषिक व स्मृतिचिन्ह**
दरवर्षी शिवाजी विद्यापीठाच्या संलग्न महाविद्यालयात/मान्यता प्राप्त संस्थेत राष्ट्रीय किंवा राज्य किंवा विद्यापीठ स्तरावरील युवा महोत्सवात विशेष प्राविण्य मिळविणा—या विद्यार्थ्यास किंवा विद्यार्थिनीस किंवा संघास सदरचे पारितोषिक देण्यात येईल. याबाबतची कार्यवाही ही दरवर्षी विद्यार्थी कल्याण विभागाकडून करण्यात येईल.

६. सदर पारितोषिकांसाठी विद्यापीठ संलग्न महाविद्यालयातील/मान्यता प्राप्त संस्थेतील प्रथम पदवीस्तरावरील नियमित शिक्षण घेत असलेले विद्यार्थी/विद्यार्थीनी/संघ पात्र ठरतील. दुबार पदवी (Double Graduation) ला प्रवेशित असलेले विद्यार्थी/ विद्यार्थिनी उपरोक्त पारितोषिकांसाठी अपात्र ठरतील.

७. उपरोक्तबाबतची अंमलबजावणी ही मार्च/एप्रिल, २०१३ च्या परीक्षेपासून करण्यात येईल.

८. उपरोक्त सर्व पारितोषिके स्मृतिप्रित्यर्थ असल्याने व स्मृतिप्रित्यर्थ मिळालेल्या देणगीच्या रक्कमेतून प्रस्थापित केलेली असल्यामुळे दीक्षांत समारंभाच्या वेळी "दि प्रेसिडेंट ऑफ इंडिया जनरल प्रोफिसियन्सी, शिवाजी युनिव्हर्सिटी, कोल्हापूर" या पारितोषिक वितरणानंतर सदर पारितोषिके संबधिताना व्यासपीठावरून प्रदान करण्यात येतील.

९. उपरोक्त प्रत्येक पारितोषिकाचे स्वरूप हे रोख रक्कम रू.७,०००/—, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र असे राहील.

१०. उपरोक्त पारितोषिक क्र. १ वगळता अन्य पारितोषिकांसाठी विद्यार्थ्याने संबंधित पदवीच्या अंतिम वर्षात प्रवेशित असणे आवश्यक आहे व मागील सर्व शैक्षणिक वर्षात उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

११. पारितोषिकासंदर्भातील सर्व अधिकार विद्यापीठाचे राहतील.